# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

डॉ. पंडीत एन्. शेळके
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१


संदर्भ : सभाअ/५४१/२०१४ दि. २८ मे २०१४

**प्रति**
**मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी**
**पुणे विद्यापीठ रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये**
**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा**

**विषय : समर्थ भारत अभियानातंर्गत पुणे ते पंढरपूर 'राज्यस्तरीय हरित उर्जा व कन्यारत्न वाचवा अभियान दिंडी' करीता स्वयंसेवक पाठविणे बाबत...**

**महोदय,**

रासेयो उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, मुंबई व पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मागील नऊ वर्षापासुन पालखी सोहळयामध्ये राज्यस्तरीय हरितऊर्जा व कन्यारत्न वाचवा अभियान दिंडीचे आयोजन करण्यात येते. स्वयंसेवक, वारकरी, पालक, प्राध्यापक अशा अनेकांच्या अतिशय चांगल्या प्रतिक्रिया या दिंडीविषयी आलेल्या आहेत.

मागील वर्षाप्रमाणे यावर्षीसुद्धा हरितऊर्जा आणि कन्यारत्न वाचवा अभियान दिंडी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोबतच संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्या सोबत आपल्या विद्यापीठाची हरित ऊर्जा व कन्यारत्न वाचवा अभियान दिंडी काढण्याचे नियोजन केले आहे. **पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ व राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत राज्यस्तरीय पुणे ते पंढरपूर हरितउर्जा दिंडी आणि कन्यारत्न वाचवा अभियान दिंडीचे** आयोजन दि. २२ जून ते ९ जूलै २०१४ या कालावधीत करण्यात आले आहे.

या दिंडीचा मुख्य उद्देश कन्यारत्न वाचवा अभियान, वृक्षारोपण, ऊर्जा बचत, अक्षय प्रकाश योजना, पाणी प्रश्न, स्वच्छता इत्यादी विषयांवर जनजागरण व यातूनच स्वयंसेवक व्यक्तिमत्व विकास करणे हा आहे. या हरितऊर्जा दिंडीमध्ये महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातून २५० स्वयंसेवक सहभागी होणार आहेत.

तरी आपण आपल्या महाविद्यालयातील कमवा व शिका योजना व राष्ट्रीय सेवा योजनेतील २ स्वयंसेवक व २ स्वयंसेविका यांना दिंडीकरीता **दि. २१ जून २०१४** रोजी सायंकाळपर्यत दिंडीसाठी मुक्कामाच्या संपूर्ण तयारीने पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागात पाठविण्यात यावे ही विनंती.

सोबत येतांना स्वयंसेवकाने वैद्यकीय प्रमाणपत्र, पालकांचे संमतीपत्र, मा.प्राचार्यांचे संमतीपत्र, ओळखपत्र, रोज लागणारे कपडे, पांढरी गांधी टोपी, पंढरपूरी टाळ, रेनकोट टोपीसहित, टॉर्च (सेल सहित), चादर-सतरंजी (हलक्या वजनाचे), कॅनव्हास शूज, धोतर, पायजमा, नेहरु शर्ट (सफेद रंगाचे), ताट, वाटी, ग्लास, चमचा, दोन पासपोर्ट आकाराचे फोटो व अत्यावश्यक साहित्य सोबत आणावे.

कळावे, धन्यवाद !

***टिप** : सहभागी होणाऱ्या स्वयंसेवकांची नावे दि. १०/६/२०१४ पर्यंत पुणे विद्यापीठ, रासेयो कार्यालयास कळविणे आवश्यक आहे. नाव नोंदणी केल्याशिवाय दिंडीमधील सहभाग निश्चित होणार नाही.*

आपला विश्वासू,

**प्र. कार्यक्रम समन्वयक**
**राष्ट्रीय सेवा योजना**